**बातमीपत्र**

# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

**माहिती कक्ष, दि ०८ जुलै २०२३**

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४४९/२०२३ भादवि ४२०,४६८,४६९,४७१,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०८/०८/२००५ रोजी ते आजपर्यंतचे दरम्यान, सोलापूर शहर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०७/०७/२०२३ रोजी १४.४४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विष्णु वसंत डोके, वय- ५४ वर्षे, व्यवसाय- नोकरी ( विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था) रा. ८ व ९ पद्मशाली भवन पहिला मजला, रविवार पेठ, कन्ना चौक, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अविनाश प्रकाश बोमडयाल, २) चंद्रकांत सदानंद गालपल्ली व इतर ३ |
| **फसवणुक र** | : | १८,२४,९३५/- रुपये असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, श्री भद्रावती हातमाग विणकर सहकारी सुतगिरणी मर्या. सोलापूर पत्ता डी-११/२, एमआयडीसी, अक्कलकोट रोड, सोलापूर या सुतगिरणीचे दि. ०१/०४/२०१२ ते दि. ३१/०३/२०२२ या कालावणीत लेखापरिक्षण श्री चंद्रकांत गालपल्ली, सनदी लेखापाल, मे. बत्तुल ॲण्ड असोसीएटस, पत्ता- १०७, अदिती गृहनिर्माण सहाकारी संस्था, १२२/३, अनुराग अपार्टमेंट, कमला नेहरु पार्क शेजारी एरंडवाना पुणे-४, यांनी केलेले असुन सदर सुतगिरणीचे लेखापरीक्षणाचे वेळी सुतगिरणीमध्ये अपहार व फसवणुक झाल्याचे सुतगिरणीचे लेखापरीक्षक चंद्रकांत गालपल्ली यांचे निदर्शनास आलेले असुन त्याबाबत सदर संस्थेचा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल दि. ०२/०६/२०२२ रोजी व त्यावरील विशेष अहवाल मा. आयुक्त, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र शासन नागपुर यांना दि. २०/०६/२०२२ रोजी सादर केला आहे. भद्रावती सुतगिरणी ही नोंदणीकृत संस्था असुन सदर संस्थेची मौजे होनसळ तालुका उत्तर सोलापूर येथे गट नं. ३५ मध्ये ४.२१ आर व गट नं. ३६.२ मध्ये ८.५७ आर जमीन आहे. सदरची जमीन पडीक व नापिकी आहे. येथे बांधकाम वगैरे झालेले नाही. सदर जमिनीचे सह. दुय्यम निबंधक वर्ग- २, सोलापूर उत्तर-२, यांनी दि. २८/०८/२००५ रोजी जमीनीचे मुल्यांकन एकुण- ७,४५,०७४/- रु एवढे केलेले आहे. सदर जमिन विक्रीस मा. वस्त्रोद्योग संचालनालयाची मंजुरी / परवानगी अप्राप्त आहे. तरी सदर जमीन अविनाश प्रकाश बोमडयाल यांनी सन- २००५ साली बेकायदेशीर रित्या जा.क्रं भद्रावती सुतगिरणी/विसर्जीत/६९७/२००५ दि.०८/०८/२००५ अन्वये स्वत: मुख्य प्रवर्तक असे अग्रेषित करुन बेकायदेशीररित्या खरेदीखत करुन दिलेले आहे. सदरचे खरेदीखत लिहुन देणेबाबत संस्थेमध्ये कोणताही ठराव केलेला नाही. सदरचे मुख्य प्रवर्तक दाखवुन जागेची विनापरवाना विक्री करुन संस्थेचे खुप मोठया प्रमाणावर अफरातफर केली आहे. विक्रीचा व्यवहार संस्था दप्तरी नोंदलेला नाही.<br>तसेच राष्ट्रीय महामार्ग नं. २११, हा तुळजापूर सोलापूर असा रस्ता गेलेला आहे व त्यात संस्थेचे गट नं.३५ पैकी क्षेत्र ८६७ चौ.मी व गट नं. ३६ पैकी १४३३ चौ.मी असे एकुण २३०० चौ.मी इतके क्षेत्र राष्ट्रीय महामार्ग यांनी संपादित केलेले आहे. सदरची जमिनीची नुकसान भरपाई बाबत संस्थेने शासनाकडे पत्रव्यवहार केलेले होते. राष्ट्रीय महामार्गामध्ये संपादित केलेली जमिनीची भरपाई मिळण्यासाठी आरोपीत क्रं. १ याने बँक ऑफ महाराष्ट्र शाखा साखर पेठ येथे चालु खाते उघडले व सदरील खात्यामध्ये राष्ट्रीय महामार्गाचे रक्कम रु. ६,७१,३७०/- आणि दि. २०/०३/२०१८ रोजी रक्कम रु. ११,५३,५६५/- असे एकुण १८,२४,९३५/- रुपये इतकी जमा केलेले आहे. त्यामुळे सदर संस्थ व संचालक मंडळानी अविनाश बोमडयाल व त्यांच्या कुटुंबिय आणि इतर बिगर |

| | | |
|---|---|---|
| | | सभासद यांनी सदर रक्कम जमा करुन घेतलेली आहे व सदरची रक्कम आरोपीत क्रं. १ यांनी व्यक्तीगत व आपल्या कुटुंबाच्या नावाने इतर बिगर सभासदांच्या नावाने सदरील रक्कम काढलेली आहे. तरी यातील आरोपीत क्रं. १ व त्याचे कुटुंबीय व इतर संबंधित दोषी व्यक्ती यांनी बेकायदेशीररित्या सुतगिरणीची जमीन विक्री करुन व बनावट कागदपत्राव्दारे राष्ट्रीय महामार्गाचे संस्थेचे रु. १८,२४,९३५/- अपहार व फसवणुक केलेली असुन अपहार व फवसवणुकीबाबत संबंधितांवर गुन्हा दाखल करणेबाबत मा आयुक्त, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र शासन, नागपुर यांनी शासकीय नियमानुसार लेखापरीक्षक चंद्रकांत सदानंद गालपल्ली यांना प्राधिकृत केलेले असताना सुध्दा संदर संस्थेच्या दोषी व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल केला नाही व दोषी व्यक्तींना मदत केली आहे म्हणून. तपास: - सपोनि कुलकर्णी - **९७६५९००१००** |